दिनांक २७/०६/२०१८

# प्रेसनोट

## नवीमुंबई येथील विक्री कर, वस्तु व सेवा कर अधिकारी यांना लाच स्विकारतांना अटक

दिनांक २७/०६/२०१८ नवीमुंबई येथील श्रीमती भारती अनिल कोलते, वय ४८ वर्षे विक्री कर अधिकारी, वस्तु व सेवा कार्यालय, कोकण भवन, नवीमुंबई यांना तक्रारदार यांच्याकडून २५,०००/-रु. लाच स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले त्याबाबत थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे

यातील तक्रारदार यांचे व्हॅट रिफंड मिळण्यासाठी लोकसेविका श्रीमती भारती अनिल कोलते यांनी तक्रारदार यांच्याकडे १,५०,०००/-रु. लाचेची मागणी केली होती. सदरबाबत तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे तक्रार नोंदवली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता, लोकसेविका यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरून अॅसीबी, ठाणे यांनी सापळयाचे आयोजन करून लोकसेविका श्रीमती भारती अनिल कोलते यांना तक्रारदार यांचेकडून २५,०००/-रु. असे लाचेच्या स्वरूपात स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले आहे. गुन्हयांचा पुढील तपास, पोलीस निरिक्षक, श्री. लक्ष्मण राठोड, अॅसीबी, ठाणे हे करत आहेत.

**शासकीय लोकसेविकांना लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

---

१) टोल फ्रि क्र. :- १०६४
२) दुरध्वनी क्रमांक :- ०२२-२५४२७९७९
३) ई-मेल आयडी :- spacbthane@majapolice.gov.in
www.acbmaharashra.gov.in

Scanned by CamScanner